

**नाशिक :** सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा क्लब ऑफिसरपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. मधुकर शेलार, प्रा. स्वाती तपकिरे, प्रा. अमित मोगल.

# 'सीएमसीएस'च्या विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १८ : सायबर सुरक्षेबाबत जनजागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने पुण्यातील क्विक हिल फाउंडेशनतर्फे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविला जातो आहे. जिल्ह्यातून मविप्रच्या वाणिज्य, व्यवस्थापन आणि संगणकशास्त्र (सीएमसीएस) महाविद्यालयाची, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड केली आहे.

सीएमसीएस महाविद्यालयात अध्यक्ष म्हणून साहिल सोनवणे, सचिवपदी हर्षदा बोरसे, अंजली दाऊद माध्यम प्रतिनिधी, हितेश बाविस्करची संचालकपदासाठी निवड करण्यात आली आहे. याशिवाय १६ विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर्स म्हणून निवड झाली. निवड प्रक्रियेमध्ये सायबर सुरक्षा जाणीव, सामाजिक बांधिलकी, नेतृत्व क्षमता आणि संवाद कौशल्ये या घटकांचा विचार करण्यात आला आहे. निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वात सायबर सुरक्षा क्षेत्रात कार्यशाळा, संवादसत्रे, जनजागृती मोहिमा व इतर शैक्षणिक उपक्रमांचे वर्षभर आयोजन केले जाणार आहे. यासाठी फाउंडेशनतर्फे महाविद्यालय, विद्यार्थ्यांसाठी विशेष निधीची तरतूद केली आहे. आयक्यूएसी समन्वयक प्रा. अमित मोगल, सायबर समन्वयक प्रा. स्वाती तपकिरे यांचे मार्गदर्शन लाभले. क्विक हिल फाउंडेशनचे अध्यक्ष अनुपमा काटकर, सचिव अजय शिर्के, संचालक गायत्री केसकर, संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, शिक्षणाधिकारी डॉ. अजित मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर शेलार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.